**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर**

**जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर**
**क्रमांक-मह/आस्था/१०५/२०१०**
**कोल्हापूर दि.१५/०२/२०१०**

जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचे आस्थापनेवरील **जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी** संवर्गाची महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्रमांक आव्यप्र-२००७/प्र.क्र.१२५/आव्यप्र-१ दिनांक २१ जानेवारी २०१० अन्वये एक वर्ष मुदतीकरिता मानधन (ठोक रक्कम रुपये २२,०००/- प्रती महिना) तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात निर्माण केलेले पद कंत्राट पध्दतीने भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहून विहीत नमुन्यात दिनांक २६/०२/२०१० पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

---

**शैक्षणिक पात्रता**

पदवी / पदव्युत्तर पदवी (सामाजिक शास्त्रे)

**अनुभव**

१) ३ वर्षाचा अनुभव त्यातील किमान २ वर्षे आपत्ती व्यवस्थापनातील अनुभव
२) मराठी व इंग्रजी भाषाचे चांगले ज्ञान असणे इष्ट
३) टिप्पणी लेखन, अहवाल लेखन यामध्ये विशेष प्राविण्य
४) शासकीय कामाच्या अनुभवास विशेष प्राधान्य देणेत येईल. विशेषतः प्रकल्प हाताळण्याचा पूर्वानुभव असल्यास त्याचा विचार केला जाईल.

**अटी व शर्ती :-**

१. पुर्णपणे तात्पुरत्या स्वरुपात व कंत्राटी पध्दतीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या पदाची पदभरती होईल. या नेमणुकीमुळे उमेदवाराचा शासनाकडे कोणताही हक्क निर्माण होणार नाही.
२. अर्जदाराने बंद लखोटयामधूनच अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जाचा विहीत नमुना सोबत जोडला आहे.
३. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीला बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा त्याला हक्क प्राप्त झाला असे नाही.
४. छाननीअंती ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात आलेले नाहीत अशा उमेदवारांना तोंडी मुलाखतीसाठी अथवा परीक्षेसाठी व कागदपत्रांची पडताळणी करणेकामी बोलाविणेत येईल. पात्र उमेदवारांना तोंडी मुलाखतीसाठी दिनांक व स्थळ अलाहिदा कळविणेत येईल.
५. अंतिम निवड ही उमेदवाराच्या गुणवत्तेनुसार केली जाईल.
६. उमेदवारांना तोंडी मुलाखतीस स्वखर्चाने यावे लागेल.
७. जिल्हाधिकारी यांचेकडे तोंडी अथवा लेखी पत्राव्दारे वशिला लावण्याचा अगर कोणताही इतर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित उमेदवार आपोआप अपात्र ठरेल.
८. अर्जदाराने सादर केलेली सर्व कागदपत्रे स्पष्ट व वाचनीय असणे आवश्यक आहे. कागदपत्रे वाचनीय नसतील तर त्यांचा विचार केला जाणार नाही व अर्ज आपोआप अपात्र ठरेल.

**<u>आवश्यक सूचना :-</u>**

१. अर्जामध्ये उमेदवाराने संपूर्ण नांव, पत्रव्यवहाराचा पत्ता, जन्मतारीख, वय, जात, पोटजात व जातीचा प्रवर्ग, शैक्षणिक अर्हतेबाबतचा संपूर्ण तपशिल (टक्केवारीसह), कामाचा अनुभव असल्यास त्याबाबत तपशिल इत्यादी माहिती नमुद करणे आवश्यक आहे. अपूर्ण माहिती भरलेले अर्ज अपात्र ठरविणेत येतील.

२. अर्जदारांपैकी शासकीय कर्मचा-यांना त्यांच्या विभाग प्रमुखांनी संमत्ती दिली असेल तरच त्यांचे अर्ज ग्राहय धरण्यांत येईल. तसेच कार्यालयप्रमुखांमार्फत विहीत नमुन्यातील बंद लखोट्यातून अर्ज खालील पत्यावर पाठविणे आवश्यक आहे.

३. अर्जदाराने अर्जासोबत पुराव्याच्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. **<u>मुळ प्रती जोडू नयेत</u>**.

४. वयाचा पुरावा जन्मतारखेचा दाखला / माध्यमिक शाळा प्रमाणपत्र / शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकीत प्रत यावरुन ग्राहय धरता येईल. साक्षांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे.

५. सदरची सपूर्ण जाहिरात व त्यासोबतचे अर्जांचे नमुने जिल्हाधिकारी कार्यालयाचे संकेत स्थळ (Kolhapur.nic.in) इथे प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

६. उमेदवारांनी आपले अर्ज समक्ष किंवा पोष्टाव्दारे खालील पत्यावर **<u>दिनांक २६/०२/२०१० रोजी सायकांळी ०५.०० वाजेपर्यंन्त</u>** पोहोचतील अशा बेतानेच पाठवावेत. त्यानंतर पोष्टाव्दारे वा अन्य प्रकारे प्राप्त होणा-या अर्जांची अथवा त्यासंबंधी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. तसेच दिलेल्या पत्याव्यतिरिक्त अन्य ठिकाणी प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

७. उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्जावर विहीत ठिकाणी अलीकडील काळात काढलेला एक पासपोर्ट साईजचा फोटो लावावा व फोटो खाली दर्शविलेल्या योग्य ठिकाणी स्वाक्षरी करावी.

८. अर्जामध्ये नमुद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास संबंधीत उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहील तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहिल.

९. **अर्ज पाठविण्याचा पत्ता :- जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय (आस्थापना शाखा) कोल्हापूर - ४१६ ००३.**

**कोल्हापूर**
**दिनांक :- १५/०२/२०१०**

**सही/-**
**(लक्ष्मीकांत देशमुख)**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती**
**तथा जिल्हाधिकारी कोल्हापूर**

# <u>जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पदासाठी अर्ज</u>

| पासपोर्ट साईज फोटो साक्षांकित केलेला |
|---|

**प्रति,**

**मा.जिल्हाधिकारी,कोल्हापूर**

महोदय,

आपल्या कार्यालयाची जाहीरात क्रमांक दिनांक ला अनुसरुन मी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पदासाठी अर्ज करीत असून माझा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१. संपूर्ण नांव :- (मराठीत) . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
(आडनांव प्रथम लिहावे) (इंग्रजीत) .. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

२. पत्रव्यवहाराचा पत्ता :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

३. लिंग :- पुरुष / स्त्री (नको असेल ते खोडावे) . . . .

४. राष्ट्रीयत्व :- भारतीय / अभारतीय (नको असेल ते खोडावे) . .

५. अर्जदाराची जन्मतारीख :- . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

६. दिनांक १/०१/२०१० रोजीचे वय :- वर्ष ---------- महिने --------- दिवस ----

७. अर्जदाराची जात / प्रवर्ग :- जात - .. . . . . . पोटजात (असल्यास) -. . . . .

८. अर्जदाराची शैक्षणिक अर्हता :

| **शैक्षणिक पात्रता** | **परिक्षा मंडळाचे नांव** | **उत्तीर्ण होण्याचे वर्ष** | **एकूण मिळालेले गुण** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|
| १. माध्यमिक शालांत (प्रमाणपत्र परिक्षा इ.१० वी) | | | | |
| २. उच्च माध्यमिक शालांत (प्रमाणपत्र परीक्षा इ.१२वी) | | | | |
| ३. पदवी, पदव्युत्तर पात्रता | | | | |

**अनुभव तपशील -**

| अ.नं. | कालावधी | आदेश क्रमांक व दिनांक | केलेल्या कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

खालील वैयक्तिक माहिती संबंधी आवश्यक ते सक्षम अधिका-यांच्या दाखल्याच्या सत्यप्रती सोबत जोडाव्यात.

१. शैक्षणिक पात्रते संबंधीचे गुणपत्रक व प्रमाणपत्र साक्षांकित प्रती

२. अनुभवाबाबत वर नमूद केलेल्या माहितीच्या तपशिलाबाबतचे कागदपत्र / प्रमाणपत्र साक्षांकित प्रती

**(अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी)**

**अर्जदाराने स्वाक्षरीत करावयाचे प्रतिज्ञापत्र**

मी असे प्रमाणित करतो / करीते की, जिल्हाधिकारी कोल्हापूर यांची कार्यालयाची जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पद भरतीची जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली आणि मला समजली. सदर पदासाठी जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तींची मी पूर्तता करीतो / करीते. याची मी खात्री केली आहे. या अर्जात दिलेली माहिती माझ्या माहिती प्रमाणे बरोबर व खरी आहे. तसेच अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास त्याच माहितीच्या आधारे मला निवड प्रक्रीयेत दिलेला प्रवेश कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल, परिणामी मिळालेली नोकरी गमविण्यास मी बाध्य राहील व पुढील योग्य त्या कारवाईस पात्र राहील याची मला जाणीव आहे.

**(अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी)**